# दि अभिनव सहकारी बँक लिमिटेड, डोंबिवली

**दि अभिनव सहकारी बँक लिमिटेड, डोंबिवली यांच्या बुधवार, दिनांक १० ऑगस्ट, २०२२ रोजी झालेल्या ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त :**

दि अभिनव सहकारी बँक लिमिटेड, डोंबिवली यांची ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार, दिनांक १० ऑगस्ट, २०२२ रोजी सकाळी १० वाजता हॉटेल शिवम, प्लॉट नं. पी-१४, एल. आय.सी. ऑफिस जवळ, आर. आर. हॉस्पिटलच्या मागे, एम. आय. डी. सी., डोंबिवली ( पूर्व) येथे संपन्न झाली. या सभेस एकूण १४० सभासद उपस्थित होते. आवश्यक गणपूर्ती न झाल्यामुळे सभा तहकुब करुन नियोजित वेळेनंतर अर्ध्या तासाने म्हणजे सकाळी ठिक १०.३० वाजता सुरु करण्यात आली. सभेचे अध्यक्षपद बँकेचे अध्यक्ष, माननीय श्री. रमेश रतन पाटील यांनी भूषविले.

बँकेच्या कर्मचारी, सौ. अश्विनी सुनिल प्रभुणे यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले व बँकेच्या प्रथेनुसार बँकेच्या ज्येष्ठ सभासद, सौ. चंद्रकला चौधरी यांना बँकेचे आद्य संस्थापक, कैलासवासी श्री. दत्तात्रय माधवराव मुनशी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन, श्रीलक्ष्मीच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलन करण्याची विनंती केली.

तद्नंतर विषय पत्रिकेनूसार सभा सुरु होण्यापुर्वी सभासदांनी कार्यालयाकडे अर्ज केल्यानूसार इयत्ता १० वी, १२ वी, पदवी आणि पदव्युत्तर परिक्षांमधे तसेच, क्रिडा क्षेत्रात उज्ज्वल कामगिरी पाल्यांचा संचालक मंडळातर्फे बँकेचे सन्मानचिन्ह, रोख पारितोषिक व पुष्पगुच्छा देऊन सत्कार करण्यात आला.

यानंतर सौ. अश्विनी सुनिल प्रभुणे यांनी बँकेचे माननीय अध्यक्ष, श्री. रमेश रतन पाटील यांना अध्यक्षीय भाषण करण्याची विनंती केली.

सर्वप्रथम माननीय अध्यक्ष, श्री. रमेश रतन पाटील यांनी उपस्थित सर्व सभासद बंधु-भगिनींचे व व्यासपीठावरील सर्व मान्यवर संचालकांचे बँकेच्या ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमधे हार्दिक स्वागत केले. तद्नंतर त्यांनी माहिती दिली की, मागील दिनांक २४ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील ठरावान्वये सन २०२१-२०२२ या कालावधीकरिता बँकेचे वैधानिक लेखापरिक्षक म्हणून मे. बाऊल सावला ॲन्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकाउंटंट्स यांची नेमणूक करण्यात आली होती. वैधानिक लेखापरिक्षकांनी त्यांचा अहवाल बँकेस व माननीय सहकार आयुक्त व निबंधक यांच्या कार्यालयात सादर केल्यामुळे सदर सभा आयोजित करण्यात आली.

तद्नंतर त्यांनी सन २०२१-२०२२ या कालावधिकरिताचा बँकेचा ४७ वा वार्षिक अहवाल, वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेले ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संचालक मंडळाच्यावतीने सभासदांसमोर सादर केला. अहवाल वर्षी आपल्या बँकेस वैधानिक लेखापरिक्षकांनी " अ " वर्ग दिला असल्याची माहिती त्यांनी सभेस दिली. सभासदांना ५ टक्के दराने लाभांश वितरित करण्याची शिफारस संचालक मंडळाने सभेस केली.

दिनांक ३१ मार्च, २०२२ अखेर कामकाजाचा संक्षिप्त आढावा सभेसमोर मांडतांना त्यांनी विदीत केले की, बँकेच्या ठेवी रु. ४६६.६३ कोटी, कर्जव्यवहार रु. २४२.७७ कोटी, गुंतवणूक रु. २४४.२२ कोटी, खेळते भांडवल रु. ५४९.६२ कोटी असून बँकेस अहवाल वर्ष अखेर रु. १.२५ कोटी एवढा निव्वळ नफा झाला आहे.

THE ABHINAV SAHAKARI BANK LTD. Dombivli H. O. Central Office

तद्नंतर त्यांनी असे विदित केले की आपल्या बँकेची केळकर रोड स्थीत डोंबिवली पूर्व शाखा व समाशोधन विभागाची जागा भाडे तत्वावर असुन त्याच्या भाड्या पोटी मोठी रक्कम प्रती वर्षी खर्ची पडते त्या अनुषंगाने डोंबिवली पूर्व शाखा हि स्वमालकीच्या जागेत स्थलांतरीत करण्याची प्रक्रीया सुरु असुन समाशोधन विभागाचे स्थलांतरण आपल्या एम.आय.डी.सी. स्थीत स्वमालकीच्या जागेत तिसऱ्या मजल्यावर करण्या करिता आवश्यक असलेल्या नुतनिकरणाचे काम सुरु आहे. त्या नुसार लवकरच समाशोधन विभाग तेथे स्थलांतरित करण्यात येईल.

सभा अध्यक्षांनी नमूद केले की, बँकेच्या ४७ व्या अहवालात सन २०२२-२०२३ चे नफा-तोटा अंदाज पत्रक दिले आहे त्यानूसार बँकेचा निव्वळ नफा होण्याकरिता सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील. या सभेला उपस्थित राहिल्याकरिता त्यांनी सभासदांचे पुन्हा आभार मानले व सभेच्या विषयपत्रिकेनुसार सभेचे कामकाज होईल असे नमूद केले.

तद्नंतर विषयपत्रिकेनूसार सभेस सुरुवात करण्यात आली.

उप-सरव्यवस्थापक, श्री. सुरेश मोहन शिंदे यांनी उपस्थित सर्व सभासदांचे ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत स्वागत करुन, सभेची विषयपत्रिका व सूचना सभेसमोर वाचून दाखविली.

**विषय क्र. १. दिनांक २४ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या ४६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

सभेच्या सुरुवातीला २४ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या बँकेच्या ४६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या छायांकित प्रती बँकेच्या मुख्य कार्यालयात व सर्व शाखांमधे सभासदांकरिता उपलब्ध करुन दिल्या असल्याची तसेच बँकेच्या वेबसाईट वर उपलब्ध करुन दिल्याची माहिती श्री. सुरेश मोहन शिंदे, उप-सरव्यवस्थापक यांनी देऊन सदर इतिवृत्ताचे वाचन करण्याकरिता श्री. चंद्रशेखर गो. जोशी व्यवस्थापक (कर्ज विभाग ) यांना पाचारण केले. यावर श्री. उल्हास पाटील यांनी सदर इतिवृत्त सभासदांकडे असल्यामुळे इतिवृत्त वाचन केले नाही तर सभेचा वेळ वाचेल असे सूचवीले. यावर सर्व सभासदांनी संमती दिली व पुढील ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र. १.** ठराव करण्यात येतो की, दिनांक २४.०९.२०२१ रोजी झालेल्या बँकेच्या ४६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात येत आहे.

सुचक : श्री. उल्हास पाटील (स.क्र.९०२१४ )
अनुमोदक : श्री. रमेश नानुलाल खंडेलवाल (स.क्र.२३०६७)
**ठराव एकमताने मंजूर.**

**विषय क्र. २. दिनांक ३१.०३.२०२२ अखेरच्या वर्षाचा, बँकेच्या कामकाजाचा अहवाल व वैधानिक लेखापरिक्षकांनी तपासलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्विकृत करणे.**

श्री. सुरेश मोहन शिंदे, उप-सरव्यवस्थापक यांनी विदीत केले की, बँकेचे अध्यक्ष, श्री. रमेश रतन पाटील यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात माननीय संचालक मंडळाचा अहवाल सभेसमोर सादर केला होता. श्री. गोरखनाथ सखाराम म्हात्रे यांनी विचारणा केली की बँकेच्या कर्मचाऱ्यांच्या पगारा पोटी व शाखेच्या भाड्या पोटी दर वर्षी किती रक्कम खर्च होते. शाखेचे भाडे ज्या प्रमाणात खर्च होते त्यावर बँकेने काही पर्याय शोधण्याचा प्रयत्न केला आहे का? तसेच श्री. मुकुंद भोजराज भोईर यांनी सुचना केली की बँकेच्या सर्व शाखा या स्व:मालकीच्या व्हाव्यात.

ABHINAV SAHAKARI BANK Dombivli H. O.

३..

या वर उत्तर देतांना श्री. सुरेश मोहन शिंदे, उप-सरव्यवस्थापक यांनी सांगितले की केळकर रोड, डोंबिवली (पूर्व) या शाखे करीता स्व:मालकीची जागा घेण्याची प्रक्रिया सुरु आहे व ती शाखा लवकरच स्व:वास्तूत स्थलांतरीत होईल.

तद्नंतर श्री. गोरखनाथ सखाराम म्हात्रे यांनी प्रश्न उपस्थीत केला की, पंजाब ॲन्ड महाराष्ट्र को-ऑप. बँक लि आपण किती रक्कम मुदत ठेव म्हणून ठेवली आहे व त्या रकमेची तरतुद आपण कशी केली आहे. यावर श्री. गजानन मोरेश्वर घैसास, संचालक यांनी उत्तर देतांना सांगीतले कि पंजाब ॲन्ड महाराष्ट्र को-ऑप. बँक लि ही आता युनीटि स्मॉल फायनांस बँकेने ताब्यात घेतली असल्यामुळे रिझर्व बँकेने ठरवून दिल्या प्रमाणे आपण त्या रकमेची तरतुद केलेली आहे.

तद्नंतर श्री. मुकुंद भोजराज भोईर यांनी प्रश्न उपस्थीत केला की अंबरनाथ शाखेत ते गेले असता तेथे शाखा व्यवस्थापक उपस्थीत नव्हते. त्यावर उत्तर देतांना उप-सरव्यवस्थापक यांनी सांगीतले की ज्या वेळेस श्री. मुकुंद भोईर अंबरनाथ शाखेत गेले होते त्यावेळेस तेथील शाखा व्यवस्थापक हे बँकेच्या कामा निमित्त मुख्य कार्यालयात आलेले होते.

तद्नंतर उप-सरव्यवस्थापक यांनी माहिती दिली की अहवालात छापण्यात आलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रकाचे स्वरुप रिझर्व्ह बँकेने ठरवून दिल्याप्रमाणेच आहे.

अशी सविस्तर चर्चा होऊन पुढील ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र. २.** ठराव करण्यात येतो की, वर्ष २०२१-२२ या कालावधीचा माननीय संचालक मंडळाचा बँकेच्या कामकाजाबद्दलचा अहवाल व वैधानिक लेखापरिक्षक यांचा अहवाल व त्यांनी प्रमाणित केलेला ताळेबंद व नफा - तोटा पत्रकांस ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक : श्री. अनंत नामदेव अगावने (स.क्र.११३००८)
अनुमोदक : श्री. मुकुंद भोजराज भोईर (स.क्र. ६७२५)

**ठराव एकमताने मंजूर.**

**विषय क्र. ३. सन २०२१-२२ च्या आर्थिक वर्षासाठी माननीय संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे नफा वाटणीस मंजूरी देणे.**

उप-सरव्यवस्थापक श्री. सुरेश मोहन शिंदे यांनी माहिती दिली की, यांनी सन २०२१-२०२२ साठी महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ६५ अन्वये सर्व तरतूदी केल्यानंतर बँकेस अहवाल वर्षी रु. १,२४,४८,२४२.२३ एवढा नफा झाला आहे. सदरहू नफा रकमेत मागील वर्षाचा शिल्लक नफा रु. ४१,६०१.५८ जमा केल्यास अहवाल वर्ष अखेर एकूण नफा रु. १,२४,८९,८४३.८१ हा निव्वळ नफा विनियोगाकरिता उपलब्ध असल्याची माहिती दिली.

संचालक मंडळाने पुढील प्रमाणे नफा वाटणीची शिफारस केली असल्याचे उप-सरव्यवस्थापक यांनी विदीत करुन त्यास मान्यता देण्याची विनंती त्यांनी सभासदांस केली.

| | | |
|---|---|---|
| वैधानिक राखीव निधी | रु. | ३१,२२,०००.०० |
| लाभांश ५ टक्के ( हिस्सेदर राशीने ) | रु. | ७४,९५,९४५.०० |
| इमारत निधी | रु. | ९,००,०००.०० |
| निवडणूक निधी | रु. | ९,००,०००.०० |
| पुढील वर्षाकरिता शिल्लक नफा | रु. | ७१,८९८.८१ |
| **एकूण** | **रु.** | **१,२४,८९,८४३.८१** |

या विषयावर सविस्तर चर्चा झाली व खालील ठराव पारीत करण्यात आला.

ABHINAV SAHAKARI BANK Dombivli

**ठराव क्र. ३.** ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ६५ अन्वये आवश्यक तरतूदी केल्यानंतर संचालक मंडळाने पुढील तपशिलाप्रमाणे शिफारस केलेल्या नफा वाटणीस मंजूरी देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| वैधानिक राखीव निधी | रु. | ३१,२२,०००.०० |
| लाभांश ५ टक्के ( हिस्सेदर राशीने ) | रु. | ७४,९५,९४५.०० |
| इमारत निधी | रु. | ९,००,०००.०० |
| निवडणूक निधी | रु. | ९,००,०००.०० |
| पुढील वर्षाकरिता शिल्लक नफा | रु. | ७१,८९८.८१ |
| **एकूण** | रु. | १,२४,८९,८४३.८१ |

सूचक : श्री. उल्हास पाटील (स.क्र. ९०२१४)
अनुमोदक : श्री. रविंद्र लोखंडे (स.क्र. ८९२२० )

**ठराव एकमताने मंजूर.**

**विषय क्र. ४. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या अहवालावर चर्चा करणे व स्विकृत करणे.**

विषयाच्या सुरुवातीस माननीय वैधानिक लेखापरिक्षक, मे. बाऊल सावला ॲन्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकाउटंट्स यांनी सन २०२१-२२ चे बँकेच्या केलेल्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाचा गोषवारा, श्री. नविनचंद्र पुरुषोत्तम मेहता, व्यवस्थापक (लेखा परीक्षण विभाग ) यांनी सभेसमोर वाचून दाखविला. यांनी माहिती दिली की, यावर्षी बँकेस वैधानिक लेखापरिक्षकांनी " अ " वर्ग दिलेला आहे. कार्यालय सदरहू लेखापरिक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल विहित कालावधीमधे तयार करुन तो आवश्यक विभागांकडे पाठविला जाईल.

सदरहू विषयावर सविस्तर चर्चा झाली व पुढील ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र. ४.** ठराव करण्यात येतो की, माननीय वैधानिक लेखापरिक्षक, मे. बाऊल सावला ॲन्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकाउटंट्स यांनी बँकेच्या सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या केलेल्या वैधानिक लेखापरिक्षणाचा अहवाल स्विकृत करण्यात येत आहे.

सूचक : श्री. रमेश नानुलाल खंडेलवाल (स.क्र. २३०६७)
अनुमोदक : श्री. मुकुंद भोजराज भोईर (स.क्र. ६७२५)
**ठराव एकमताने मंजूर.**

**विषय क्र. ५. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.**

विषयाच्या सुरुवातीस सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षक, मे. बाऊल सावला ॲन्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकाउंटंट्स यांनी बँकेच्या केलेल्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालाचा गोषवारा श्री. नविनचंद्र पुरुषोत्तम मेहता, व्यवस्थापक (लेखा परीक्षण विभाग ) यांनी सभेसमोर वाचून दाखविला. सदरहू वैधानिक लेखापरिक्षणाचा दोष दुरुस्ती

ABHINAV SAHAKARI BANK Dombivli

५..

अहवाल दिनांक १४ ऑक्टोबर, २०२१ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत मंजूर केला होता. दोष दुरुस्ती / पूर्तता अहवाल लेखापरिक्षकांनी तपासून दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१ रोजी स्विकृत केल्यावर सदरहू दोष दुरुस्ती / पूर्तता अहवाल माननीय सहकार आयुक्त, पुणे व संबंधित कार्यालयाकडे सादर करण्यात

आल्याची माहिती सभेस देण्यात आली. अशा प्रकारे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या दोष दुरुस्ती अहवालावर चर्चा होऊन तो स्विकृत करण्यात आला.

**ठराव क्र. ५.** ठराव करण्यात येतो की, माननीय वैधानिक लेखापरिक्षक, मे. बाऊल सावला ॲन्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकाउटंट्स यांनी बँकेच्या सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद हि सभा घेत आहे.

सूचक : श्री. किसन गायकर (स.क्र.६२३२६)
अनुमोदक : श्री. मुकुंद भोजराज भोईर(स.क्र.६७२५)

**ठराव एकमताने मंजूर.**

**विषय क्र. ६. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षकांची नियुक्ती करणे.**

विषयानुषंगाने श्री. सुरेश मोहन शिंदे, उप-सरव्यवस्थापक यांनी सहकार आयुक्त कार्यालयाने सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणासाठी तयार केलेल्या लेखापरिक्षकांच्या शासनमान्य नामतालिकेमधून आपल्या बँकेकरिता सन २०२२-२०२३ या कालावधीकरिता वैधानिक लेखापरिक्षक म्हणून नियुक्ती करणेसंदर्भात बँकेच्या कार्यालयात आलेल्या अर्जांची माहिती सभेस दिली. त्यांनी सर्वसाधारण सभेस विनंती केली की, या अर्जांपैकी कलम ८१ नूसार आपल्या बँकेच्या सन २०२२-२०२३ या कालावधीकरिता कोणाही एकास वैधानिक लेखापरिक्षक म्हणून रिझर्व बँकेच्या मंजुरीस अधिन राहुन नियुक्त करण्याचा निर्णय घ्यावा. यावर सविस्तर चर्चा करण्यात आली व वैधानिक लेखा परिक्षकाची नेमणुक करण्याचे अधिकार संचालक मंडळास देण्याचे ठरविण्यात आले व खालील ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव क्र. ६.** ठराव करण्यात येतो की, संचालक मंडळास दिलेल्या अधिकाराच्या अनुषंगाने बँकेचे सन २०२२-२०२३ या कालावधीकरिता वैधानिक लेखापरिक्षक म्हणून मे. एस. व्ही. ए. बी. ॲन्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकाउटंट्स यांना रिझर्व बँकेच्या मंजुरीस अधिन राहुन नियुक्त करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. पुढे असाही ठराव करण्यात येतो की, त्यांना माननीय सहकार खात्याच्या परिपत्रकानूसार वैधानिक लेखापरिक्षणाचा मेहनताना देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सूचक : श्री. गोरखनाथ सखाराम म्हात्रे (स.क्र.६४०४१)
अनुमोदक : श्री. आकाश गायकवाड (स.क्र. १०८०२८)

**ठराव एकमताने मंजूर.**

**विषय क्र. ७. सन २०२२-२०२३ च्या अंदाजपत्रकाची नोंद घेणे.**

श्री. सुरेश मोहन शिंदे, उप-सरव्यवस्थापक यांनी बँकेच्या सन २०२२-२०२३ करिता नफा-तोट्यासंबंधीचे अंदाज पत्रक सभेसमोर सादर केले व अंदाज पत्रकाप्रमाणे आपल्या बँकेची वाटचाल चालू असून, वर्ष अखेर अंदाजपत्रकामधे नमूद केल्याप्रमाणे बँकेच्या ठेवी, कर्जव्यवहार व नफा होईल असा विश्वास व्यक्त केला.

ABHINAV SAHAKARI BANK LTD. Dombivli H. O.

विषय क्र. ८. माननीय अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

उप-सरव्यवस्थापक यांनी श्री. गोरखनाथ सखाराम म्हात्रे यांनी कार्यालयास दिनांक ०४.०८.२०२२ रोजीच्या दिलेल्या पत्रान्वये विचारणा केली की बँकेने मे. श्री डेंटल स्पेशालिटी हॉस्पिटल यांना दिलेले कर्ज हे थकीत असुन त्यावर काय कायदेशिर कार्यवाहि केली आहे व सदर

कर्जप्रकरणात किती कर्ज वसुली झाली आहे . यावर उत्तर देतांना उप-सरव्यवस्थापक यांनी माहिती दिली कि सदर कर्ज प्रकरणी मागील ३ महिन्यात कर्जदाराकडून ३ कोटी रुपये कर्जापोटी वसुल करण्यात आले आहे. तसेच संबंधित कर्जदारावर कायदेशिर कार्यवाही सुरु असुन उर्वरीत रक्कम दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ पर्यंत वसुल करण्यात येईल.

माननीय उपाध्यक्ष, श्री. दिलीप मथुरादास भोईर यांनी उपस्थित असलेल्या सर्व सभासदांचे आभार मानले व राष्ट्रगितानंतर माननीय अध्यक्षांच्या संमतीने सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

सही/-
अध्यक्ष

Deputy General Manager

Recd
13/1/23
Stat. Audit